महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक,पुणे वन विभाग,पुणे
सेनापती बापट मार्ग, पुणे 411 004
दूरध्वनी – 020 25660593 ई-मेल – dycfpune@gmail.com

क्रमांक-अ/कक्ष-4-2/जमीन/ 1162 /2023-24, दिनांक - 27 / 06 / 2023.
पत्र .

विषय:- वनजमिन-पुणे
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांना पाण्याची पाईपलाईन टाकण्यासाठी 0.1402 हे. वनजमीन वळती करण्याबाबत.

संदर्भ-1) महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्रं.एफएलडी-1923/प्र.क्र.174/फ-10, दि.15/06/2023.
2) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,नागपूर यांचेकडील पत्र क्रं.कक्ष-17/FCA-51/PID-155530/Pune/876, dt.21.06.2023.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भिय क्रं.1 अन्वये 2 त्रृटी उपस्थित करण्यात आलेल्या आहेत. संदर्भिय पत्रान्वये सदर त्रृटींची पुर्तता अनुषंगिक दस्तावेजासह सादर करणे बाबत कळविण्यात आलेले आहे.

प्रकरणी आपणास कळविण्यात येते कि, संदर्भिय पत्रान्वये उपस्थित त्रृटींबाबत मुद्देनिहाय त्रृटी पुर्तता अहवाल अनुषंगिक दस्तावेजासह या कार्यालयास 5 प्रतीत सादर करण्यात यावा.
सोबत — वरीलप्रमाणे.

(राहुल पाटील,भा.व.से.)
उपवनसंरक्षक,
पुणे वनविभाग,पुणे.

प्रति,
उपअभियंता,
महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, विभाग पुणे.

प्रत- मा.मुख्य वनसंरक्षक(प्रा.), पुणे यांना वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहिसाठी अग्रेषित.
प्रत- सहा.वनसंरक्षक(सांख्यिकी/ ववंस)पुणे यांचेकडे वरीलप्रमाणे माहिती व पुढील उचित कार्यवाहिसाठी अग्रेषित.
प्रत- वनपरिक्षेत्र अधिकारी,शिरोता / वडगाव-मावळ यांना वरीलप्रमाणे माहिती व उचित कार्यवाहिसाठी.

13638 (15)

महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-१९२३/प्र.क्र.१७४/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: - १५ जून, २०२३

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे
उपवनसंरक्षक, पुणे

विषय:- वनजमिन-पुणे
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांना पाण्याची पाईपलाईन टाकण्यासाठी ०.१४०२ हे. वनजमीन वळती करण्याबाबत...

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/पुणे/ID-३६३८(२६)/१८९/२०२२-२३, दि.२०.०४.२०२३.

विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्यांची माहिती शासनास सादर करावी:-

१) केंद्रस्थ अधिकारी आणि उपवनसंरक्षक यांनी (Area Statement मध्ये) प्रस्तावित केलेल्या क्षेत्राचे गाव व त्यांचा गट नं. यामध्ये तफावत आहे.

केंद्रस्थ अधिकारी यांनी मौजे-देवघर, गट नं. ७२४, मौजे-करंडोली, गट नं. १ आणि मोजे-वाकसई, गट नं. ५४ तर, उपवनसंरक्षक यांनी मौजे-देवघर, गट नं. १, मौजे-करंडोली, गट नं. ३२ आणि मौजे-वाकसई, गट नं. ७२४ असे नमूद केले आहे. सबब, नेमक्या कोणत्या गावामधील कोणत्या गट नं. ची जमिन आवश्यक आहे, याबाबत तसेच, त्याप्रमाणे ७/१२ उतारे व सुधारित KML File सादर करावी.

२) सदर प्रकल्पामध्ये एका पॅचसाठी २० मी. रुंदीची वनजमिनीची मागणी करण्यात आलेली आहे. एवढ्या जमिनीची पाईपलाईनसाठी तेवढ्याच भागासाठी आवश्यकता आहे किंवा कसे ? नसल्यास सुधारित क्षेत्राचा तपशील सादर करावा.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन